जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER



दैनिक | वर्ष १ | अंक १९२ | रविवार, १ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


## संक्षिप्त

### एकाच कंपनीत तिसऱ्यांदा चोरी करण्याचा प्रयत्न फसला

**तळेगाव स्टेशन, ता. ३१ :** एकाच कंपनीचे साहित्य सलग तिसऱ्यांदा चोरण्याचा चार जणांचा डाव पोलिसांच्या सतर्कतेमुळे अपयशी ठरला. मावळ तालुक्याच्या जांबवडेतील एका खासगी कंपनीमधील साडेचार लाखांचे साहित्य चोरणाऱ्या चार जणांना तळेगाव एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने रंगेहाथ पकडले. चोरीसाठी वापरलेल्या वाहनासह सर्व मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. लखन सुरेश अवचिते (वय -३७, नागेश्वर विद्यालय समोर, मोशी), अमन अग्रम शेख (२१), फरीद अन्वर शेख (३५),अजय बुकल तानती (२५, तिघे रा. बर्गे वस्ती, चाकण) अशा आरोपींची नावे आहेत. जांबवडे-सुदवडी रस्त्यावरील बद्रीविशाल केमिकल अँण्ड फार्मास्युटिकल कंपनीतून गेल्या २३ डिसेंबरला अज्ञात चोरट्यांनी तांबे, अॅल्युमिनिअम, लोखंडाच्या वस्तू, मोटर पंप असे तीन लाख ४४ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरुन नेले होते. त्यानंतर कंपनीचे मालक दीपक भोपालसिंग रावत (वय-४७, वतननगर, तळेगाव दाभाडे) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# लोणी काळभोर पंचायत समिती गणात गावकी-भावकीच्या प्रतिष्ठेची रणधुमाळी

## राष्ट्रवादी विरुद्ध भाजपच्या थेट लढतीकडे लक्ष; मतदारराजाचा कौल कोणाला?

**लोणी काळभोर, ता. ३१ :** हवेली तालुक्याच्या पुर्व भागात बहुतेक सर्व निवडणुकांमध्ये भावकीगावकीच्या राजकारणासाठी ओळख असलेल्या लोणी काळभोर (ता. हवेली) गावात आता हवेली पंचायत समिती गणातही तशीच प्रतिष्ठेची आणि सत्तेची चुरशीची लढत रंगणार आहे. लोणी काळभोर पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यातील ही लढत केवळ राजकीय न राहता दोन मातब्बर नेत्यांच्या राजकीय श्रेष्ठत्वाची आणि प्रभावाची परीक्षा ठरणार आहे.

हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर आणि पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर या दोघांनीही या निवडणुकीसाठी कँबर कसली आहे. सत्तेपेक्षा प्रतिष्ठा मोठी मानणाऱ्या या दोन्ही नेत्यांनी आपापल्या ताकदीने मैदानात उतरून साम, दाम, दंड, भेद या सर्वच राजकीय अस्त्रांचा वापर सुरू केल्याचे चित्र सध्या प्रभागात दिसून येत आहे.





लोणी काळभोर गट, कदम वाकवस्ती व लोणी काळभोर-वडकी पंचायत समिती गणाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मागील काही दिवसांपासून परिसरातील राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून रेश्मा युवराज काळभोर यांनी उमेदवारी दाखल केली असून, भाजपकडून श्वेता कमलेश काळभोर यांनी थेट रणशिंग फुंकले आहे. त्यामुळे या गणात काळभोर विरुद्ध काळभोर अशी थेट आणि तितकीच जहाल लढत पाहायला मिळणार आहे.

राष्ट्रवादीच्या उमेदवार रेश्मा युवराज काळभोर यांना पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशांत काळभोर, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुनंदा शेलार, संजय गायकवाड, लोणी काळभोरचे सरपंच नागेश काळभोर, माजी सरपंच भोलेनाथ शेलार, राहुल काळभोर, माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर, विविध कार्यकारी संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब काळभोर, साधना बँकेचे संचालक प्रताप बोरकर यांचा भक्कम पाठिंबा लाभला आहे.

दुसरीकडे भाजपच्या उमेदवार श्वेता कमलेश काळभोर यांना हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर, महाराष्ट्र केसरी पै राहुल काळभोर, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास काळभोर, साधना सहकारी बँकेचे माजी संचालक सुभाष काशिनाथ काळभोर, प्रवीण काळभोर, माजी सरपंच राजाराम काळभोर, भरत काळभोर, माधुरी काळभोर, वंदना काळभोर, योगेश काळभोर तसेच कदमवाकवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड, गौरी गायकवाड आणि किरण शिवदास काळभोर यांचा सक्रिय पाठिंबा मिळत आहे.

सनी काळभोर आणि प्रशांत काळभोर या दोघांच्याही राजकीय व्यूहरचनेत एकमेकांना शह देण्याचा प्रयत्न सुरू असून, तोडीस तोड उमेदवार मैदानात उतरल्यामुळे ही निवडणूक अत्यंत रंगतदार ठरणार आहे. विशेष म्हणजे नऊ वर्षांपूर्वी झालेल्या पंचायत समितीच्या निवडणुकीत हेच दोन नेते समोरासमोर आले होते आणि त्यावेळी सनी काळभोर यांनी बाजी मारली होती. दरम्यान, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष माधव काळभोर आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रताप गायकवाड यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट न केल्याने कोणाचे पारडे जड आहे, हे सांगणे कठीण झाले आहे. त्यामुळे लोणी काळभोर पंचायत समिती गणातील ही निवडणूक शेवटच्या क्षणापर्यंत चुरशीची आणि अनिश्चित राहणार, हे मात्र नक्की आहे.

### गावकीभावकीची जोरदार लढाई होणार

लोणी काळभोर पंचायत समिती गणात ही निवडणूक केवळ पक्षीय न राहता गावकीभावकीच्या प्रतिष्ठेची बनली आहे. दोन्ही बाजूंनी मातब्बर नेते, कार्यकर्ते आणि समर्थक रिंगणात उतरल्याने संपूर्ण परिसरात राजकीय वातावरण तापले आहे. मतदारांमध्येही गटागटाचे राजकारण स्पष्टपणे दिसून येत असून, शेवटच्या क्षणापर्यंत ही लढाई अत्यंत चुरशीची राहणार, हे निश्चित आहे.

### अखेर कोण मारणार बाजी?

सनी उर्फ युगंधर काळभोर आणि प्रशांत काळभोर या दोन प्रभावी नेत्यांमध्ये लोणी काळभोर पंचायत समिती गणात प्रतिष्ठेची थेट लढत रंगली आहे. दोघांचीही राजकीय ताकद, कार्यकर्त्यांचे जाळे आणि भावकीचा प्रभाव लक्षात घेता ही निवडणूक काट्यावरची ठरण्याची चिन्हे आहेत. नऊ वर्षांपूर्वीच्या निवडणुकीचा इतिहास, सध्याची व्यूहरचना आणि अजूनही अस्पष्ट असलेल्या काही बड्या नेत्यांच्या भूमिकेमुळे अखेर कोण बाजी मारणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### मारहाणप्रकरणी एकाला अटक तर एकजण गंभीर

**पिंपरी, ता. ३१ :** जुन्या भांडणातून एकाला बेदम मारहाण केल्याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली. ही घटना चिंचवडमधील पत्राशेड येथे घडली. या प्रकरणी शशिकांत नागनाथ क्षीरसागर (रा. पत्राशेड, चिंचवड) यांनी चिंचवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सागर दत्ता साळवे (रा. पत्राशेड, चिंचवड) याला अटक केली आहे. आरोपी व फिर्यादी यांच्यात यापूर्वी भांडण झाले होते. त्यानंतर फिर्यादीने आरोपीला गल्लीत का आला, असे म्हणत हटकले असता या रागातून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली. तुला खल्लासच करतो, असे म्हणत फिर्यादीच्या डोक्यात कपडे धुण्याचे धोपाटणे मारून त्यांना जखमी केले. दुसऱ्या घटनेत किरकोळ कारणावरून तरुणावर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी देहूरोड पोलिसांनी एकाला अटक केली आहे. ही घटना मामुर्डीतील गोदरेज ग्रीनपार्क येथे घडली. या प्रकरणी विक्रमकुमार राजकुमार सहानी (रा. साईनगर, मामुर्डी) यांनी देहूरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अनिल बांगरिया (रा. बोपखेल) याला अटक केली आहे. सदनिका स्वच्छतेचे काम करण्याच्या कारणावरून आरोपीने फिर्यादीसोबत वाद घालून त्यांना शिवीगाळ व धमकी दिली.

# उरुळी कांचन-सोरतापवाडी गणात सुदर्शन चौधरींचे घोषणाबाजांना आव्हान

**उरुळी कांचन, ता. ३१ :** उरुळी कांचनसोरतापवाडी पंचायत समिती गणात यावेळी निवडणूक म्हणजे केवळ भाषणांची लढाई नव्हे, तर काम विरुद्ध पोकळ आश्वासने अशीच होणार, हे भाजपचे उमेदवार सुदर्शन चौधरी यांनी स्पष्ट संकेत दिले आहेत. निवडून आल्यानंतर सर्वसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्य देत घोषणांचा नव्हे, तर कृतीचा विकास आराखडा राबवला जाईल, असा ठाम इशारा त्यांनी विरोधकांना दिला आहे. आजपर्यंत अनेकांनी विकासाची स्वप्ने दाखवली मात्र प्रत्यक्षात गावकऱ्यांच्या वाट्याला उपेक्षा आली. हीच पोकळी भरून काढण्यासाठी भाजप मैदानात उतरली असल्याचेहि चौधरी यांनी यावेळी स्पष्ट केले.

उरुळी कांचन - सोरतापवाडी गणातील सोरतापवाडी, शिंदवणे, वळती, तरडे आणि उरुळी कांचन येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिकांचे गॅरंटी कार्ड ही अभिनव योजना राबवली जाणार आहे. मोफत आरोग्य तपासणी, औषधे व आवश्यक साहित्य यांचा यात समावेश असून, दर दोन वर्षांनी आरोग्य तपासणी बंधनकारक ठेवून वृद्धांच्या आरोग्याची जबाबदारी थेट प्रशासनावर टाकली जाणार आहे. फक्त फोटोसेशन करणाऱ्या योजनांचा नव्हे, तर प्रत्यक्ष दिलासा देणाऱ्या निर्णयांचा हा आराखडा आहे, असा टोला त्यांनी नाव न घेता विरोधकांना लगावला.

महिलांच्या बाबतीतही केवळ भाषणांपुरती सहानुभूती न दाखवता, महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा ठोस कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. वित्तपुरवठा, उत्पादन-विक्रीसाठी सुविधा आणि महिला उद्योगांना चालना देत बचत गटांच्या वस्तूंना थेट बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार आहे.



शिक्षण क्षेत्रात जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्या स्मार्ट करून विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षण, आकर्षक वह्या व पुस्तके देण्याचा संकल्प चौधरी यांनी मांडला. तरडे येथे तलाव सुशोभीकरण, पशुवैद्यकीय सुविधा आणि गावठाण बांधकाम नियमितीकरण, वळती येथे स्मशानभूमी, शाळा, आरोग्य केंद्र, तसेच पुरंदर उपसा योजनेतून घरापर्यंत पाणीपुरवठा व रस्ते विकासाची कामे प्राधान्याने हाती घेतली जाणार आहेत. दलित वस्ती मार्ग, स्मारक उभारणी, शिंदवणे येथे घन कचरा प्रकल्प, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, डिजिटल गाव योजना व पंतप्रधान सौर ऊर्जा प्रकल्प अशा बहुआयामी विकासकामांद्वारे गणाचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. पाचही गावांत घन कचरा व्यवस्थापन, ओला-सुका कचरा वर्गीकरण व खत निर्मिती, तसेच एक विद्यार्थी -एक झाड या योजनेतून पर्यावरण संवर्धनावर भर दिला जाणार आहे. त्यामध्ये वर्षभर झाड वाढवलेल्या विद्यार्थ्याला नक्कीच भेटवस्तू दिली जाणार आहे. दरम्यान, हा विकास आराखडा निवडणूक जाहीरनाम्यापुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिसेल. जनतेने संधी दिली, तर गणात बदल अटळ आहे, असा ठाम विश्वास सुदर्शन चौधरी यांनी व्यक्त केला. एकूणच, उरुळी कांचन-सोरतापवाडी गणात यावेळी राजकारण नाही, तर विकासाचीच लढाई होणार असल्याचे संकेत सुदर्शन चौधरी यांनी दिले आहेत.

# उरुळी कांचन-सोरतापवाडी जिल्हा परिषद गटात शंकर बडेकर मैदानात

**उरुळी कांचन, ता. ३१ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पूर्व हवेलीतील उरुळी कांचन-सोरतापवाडी जिल्हा परिषद गटात राजकीय हालचालींना वेग आला आहे. या गटातून उरुळी कांचनचे विद्यमान सदस्य आणि भाजपचे अधिकृत उमेदवार शंकर बडेकर यांनी शेतकरी, आरोग्य आणि नागरी सोयीसुविधा या प्रश्नांना अग्रक्रम देऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

शंकर बडेकर हे मूळचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारसरणीत वाढलेले नेतृत्व मानले जाते. मात्र स्थानिक राजकीय समीकरणांमुळे त्यांनी भाजपकडून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे या गटातील राजकीय गणिते बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर बडेकर यांची ताकद अधिक भक्कम झाल्याचेही राजकीय जाणकारांचे मत आहे.

बडेकर यांनी प्रचाराला सुरुवात केली असून, ते घरोघरी भेटी देत मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. पुणे प्राईम न्यूजशी बोलताना त्यांनी सांगितले की, उरुळी कांचन-सोरतापवाडी जिल्हा परिषद गटातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी अहोरात्र प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले. परिसरातील माता-भगिनींच्या समस्या सोडवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

नागरी सोयीसुविधांबाबत बोलताना बडेकर म्हणाले की, रस्ते, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि स्वच्छ पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांचा विस्तार करण्यावर भर दिला जाईल. जिल्हा परिषदेच्या निधीतून समाजातील सर्व घटकांपर्यंत विविध समाजकल्याणकारी योजना पोहोचवण्याचा आपला मानस असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच उरुळी कांचन जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.



आपल्या सामाजिक प्रवासाविषयी बोलताना बडेकर यांनी सांगितले की, बांधकाम व्यवसायात असताना त्यांचा जनतेशी सातत्याने संपर्क आला. पाणी, रस्ते, ड्रेनेज यांसारख्या समस्या जवळून पाहिल्या. निवडणुका झाल्यानंतर अनेक लोकप्रतिनिधी जनतेकडे दुर्लक्ष करतात, हे लक्षात आल्यानंतर समाजकारणासोबत राजकारणाची सांगड घालण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर उरुळी कांचनच्या जनतेने विश्वास दाखवत त्यांना ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून दिले.

गेल्या पाच वर्षांत जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. उरुळी कांचन- सोरतापवाडी, तरडे, वळती आणि शिंदवणे परिसरातील जनतेच्या प्रेमामुळेच भाजपने मला उमेदवारी दिली आहे, असे बडेकर यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला सामोरे जात असताना जनतेने पुन्हा एकदा संधी द्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे.

# सुनेत्रा पवार मुंबईत दाखल होताच सुळे अजितदादांच्या निवासस्थानी

**मुंबई, ता. ३१ :** अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर राज्याच्या राजकारणात निर्माण झालेल्या पोकळीने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असताना, आज राजकीयदृष्ट्या अत्यंत नाट्यमय आणि महत्त्वाची घडामोड घडली. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी शोकाकुल वातावरणात महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. हा सत्ताबदल केवळ भावनिक नसून, राज्याच्या सत्ताकारणावर दूरगामी परिणाम करणारा असल्याचे मानले जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वाधिक प्रभावी नेते, बारामतीचे राजकीय केंद्रबिंदू आणि राज्याच्या सत्तेतील निर्णायक चेहरा म्हणून ओळख असलेल्या अजित पवार यांच्या निधनामुळे पक्षासमोर नेतृत्वाचा तातडीचा प्रश्न उभा राहिला. महायुती सरकारची स्थिरता राखणे आणि प्रशासनातील निर्णयक्षमता टिकवून ठेवणे आवश्यक असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची मुंबईत तातडीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली. त्यानंतर काही तासांतच राजभवनात त्यांचा शपथविधी पार पडला.



पक्षाकडून सुनेत्रा पवार यांच्या निवडीला केवळ सहानुभूतीचा निर्णय मानण्यास स्पष्ट नकार देण्यात आला आहे. त्यांचा राज्यसभेतील अनुभव, संघटनेतील विश्वासार्हता आणि पवार कुटुंबाभोवती असलेली राजकीय पकड लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. गटनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी तातडीने आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देत घटनात्मक प्रक्रिया पूर्ण केली.

दरम्यान, बारामतीतही हालचालींना वेग आला. सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. त्यानंतर त्या काही तासांतच दिल्लीकडे रवाना झाल्या. उद्या देशाचा अर्थसंकल्प आहे. मी लोकसभेतील फ्लोअर लीडर असल्याने दिल्लीला जाणे आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी शपथविधीबाबत पूर्वकल्पना नसल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या या हालचालींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारण आणि दोन्ही गटांतील भविष्यातील समीकरणांबाबत चर्चांना उधाण आले आहे.

# कर्तव्यनिष्ठेचा आदर्श ठेवणारे पोलिस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे सेवेतून निवृत्त

**लोणी काळभोर, ता. ३१ :** पुणे शहर व सोलापूर (ग्रामीण) पोलीस दलात तब्बल ३५ वर्षे निष्ठेने सेवा बजावत शेकडो गंभीर गुन्ह्यांची यशस्वी उकल करणारे, शिस्तप्रिय व कर्तव्यदक्ष पोलिस उपनिरीक्षक सर्जेराव नागनाथ बोबडे हे शनिवारी (ता. ३१) शासकीय सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीमुळे लोणी काळभोर परिसराने एक अनुभवी, संयमी व जनतेचा विश्वास संपादन केलेला अधिकारी गमावल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.


पोलिस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात खून, बलात्कार, दरोडा, खुनाचा प्रयत्न यांसारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपींसाठी कर्दनकाळ ठरत प्रभावी तपास केला. गुन्हेगारीवर कठोर कारवाई करतानाच सर्वसामान्य नागरिकांशी सौजन्यपूर्ण संवाद, तक्रारींची तत्काळ दखल आणि कायदा व सुव्यवस्थेचा काटेकोर अंमल हे त्यांच्या कार्याचे ठळक वैशिष्ट्य राहिले. सर्जेराव बोबडे यांचा जन्म एका सर्वसामान्य कुटुंबात झाला. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पोलीस भरतीचा ध्यास घेतला. अथक परिश्रमाच्या जोरावर ते सोलापूर (ग्रामीण) पोलीस दलात पोलीस अंमलदार म्हणून भरती झाले. प्रामाणिक सेवा, शिस्त आणि कार्यतत्परतेमुळे त्यांना पदोन्नती मिळत गेली आणि पुढे पुणे शहर पोलीस दलात फौजदार म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.



लोणी काळभोर पोलीस ठाण्यात कार्यरत असताना त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक गुन्ह्यांचा छडा लावण्यात आला. अवैध धंद्यांवर धडक कारवाई करत त्यांनी परिसरात कायद्याचा दरारा निर्माण केला. महिलांच्या सुरक्षेला त्यांनी विशेष प्राधान्य दिले. तसेच शालेय विद्यार्थी, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी संवाद कार्यक्रम, रस्ता सुरक्षा मोहिमा व सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती शिबिरे आयोजित करून समाजाभिमुख पोलिसिंगचा आदर्श त्यांनी उभा केला. त्यामुळे लोणी काळभोर पोलीस ठाणे नागरिकांच्या विश्वासाचे केंद्र बनले. दरम्यान, सर्जेराव बोबडे यांच्या निवृत्तीच्या निमित्ताने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात सहकाऱ्यांच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पुणे शहर पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या हस्ते सर्जेराव बोबडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्यासह मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना सर्जेराव बोबडे म्हणाले, कर्तव्य, प्रामाणिकपणा आणि मानवतेची जाण हेच माझ्या सेवेचे सूत्र होते. पोलीस दलात जनतेची सेवा केल्याचे समाधान आहे. सेवेतून निवृत्त होताना मन दुःखी असले तरी भविष्यातही समाजासाठी कार्यरत राहीन.

> पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव बोबडे यांच्या निवृत्तीमुळे एक अनुभवी, संयमी व कर्तव्यनिष्ठ अधिकारी सेवेतून बाजूला झाला असला, तरी त्यांच्या कार्याचा ठसा लोणी काळभोर परिसरात कायम स्मरणात राहील.
> - **डॉ. राजकुमार शिंदे,** पोलीस उपायुक्त, पुणे

## संक्षिप्त



### केदारनाथ-बद्रीनाथमध्ये फोन घेऊन जाण्यास बंदी?

**केदारनाथ, ता. ३१ :** केदारनाथ आणि बद्रीनाथ धामचे दरवाजे कधी उघडणार याची घोषणा झाल्यानंतर आता भाविकांसाठी नवीन नियम बनवण्याची तयारी केली जात आहे. बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समिती (बीकेटीसी) या मुद्यावर लवकरच बैठक घेणार असून भाविकांना मंदिर परिसरात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी घालण्याची शक्यता आहे. दोन्ही धामांच्या आत एक मर्यादा निश्चित करण्याची तयारी सुरू आहे. या मर्यादेच्या आत कुणीही फोन वापरताना दिसल्यास त्याला तत्काळ पकडले जाईल. यासाठी परिसराच्या आत लॉकर बनवले जातील. मात्र लॉकर कुठे असेल आणि त्याचे भाडे किती असेल, हे अजून निश्चित झालेले नाही.

# अजित पवारांची दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आणण्याची इच्छा होती

## शरद पवारांचा विलीनीकरणावर मोठा खुलासा; सुनेत्रा पवारांच्या शपथविधीवर मौन

**पुणे, ता. ३१ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज बारामती येथे पत्रकार परिषदेत बोलताना महत्त्वपूर्ण खुलासे करत राजकीय चित्र स्पष्ट केले. सत्ता समीकरणांबरोबरच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य एकत्रीकरणावरही त्यांनी भाष्य केले.

शरद पवार यांनी सांगितले की, अजित पवार यांच्या निधनापूर्वी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत गंभीर आणि सकारात्मक चर्चा सुरू होती. या चर्चांचा अंतिम निर्णय १२ तारखेला जाहीर होणार होता. मात्र, अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे ही प्रक्रिया अचानक थांबली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, ही इच्छा अजित पवार यांची होती आणि आमचीही होती, असे शरद पवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. या चर्चांमध्ये अजित पवार आणि जयंत पाटील सक्रिय होते, मात्र आपण स्वतः थेट सहभागी नव्हतो, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील सत्ताधारी गटात हालचालींना वेग आला आहे. सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून, आज दुपारी पक्षाची महत्त्वाची बैठक होत आहे.



या बैठकीत सुनेत्रा पवार यांचे नाव उपमुख्यमंत्रिपदासाठी निश्चित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र या शपथविधीबाबत आपल्याला कोणतीही पूर्वकल्पना नव्हती, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. ही बातमी आपण सकाळी वर्तमानपत्रातूनच वाचली. आपण सध्या बारामतीत असून शपथविधीला जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी सांगितले. पक्षाच्या भविष्यातील वाटचालीवर बोलताना शरद पवार यांनी ठाम भूमिका मांडली. अजित पवार पक्षाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत होते. त्यांच्या निधनानंतर कुणीतरी पुढे येणे आवश्यक आहे. पक्षाने जो निर्णय घेतला आहे, तो त्यांचा अंतर्गत विषय आहे. आमचा राजकीय मार्ग वेगळा आहे. मात्र परिवार म्हणून आम्ही साथ देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.

या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात महत्त्वाचे संकेत मिळाले आहेत. एकीकडे अजित पवार यांच्या पश्चात राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेतृत्वाचा प्रश्न निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू आहे, तर दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येण्याची शक्यता पूर्णतः संपलेली नसल्याचेही सूचित झाले आहे. ही प्रक्रिया पुढे कशी आणि कधी आकार घेते, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### हडपसर भागात वस्त्रदालनातून रोकड चोरी

**हडपसर, ता. ३१ :** शहरात दुकानांचे कुलूप तोडून रोकड चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. हडपसर-सासवड रस्त्यावरील भेकराईनगर भागात वस्त्रदालनाचे कुलूप तोडून गल्ल्यातील रोकड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका तरुणाने फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर-सासवड रस्त्यावर तक्रारदार तरुणाचे वस्त्रदालन आहे. शुक्रवारी मध्यरात्री चोरट्यांनी वस्त्रदालनाचा दरवाजा उचकटून आत प्रवेश केला. गल्ल्यातून १७ हजार ६०० रुपयांची रोकड चोरट्यांनी लांबविली. दुकानाचा दरवाजा उचकटून रोकड चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस हवालदार कांबळे तपास करत आहेत.

# खासगी अनुदानित शाळांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांसाठी सुधारित अनुकंपा नियुक्ती योजना जाहीर

**मुंबई, ता. ३१ :** राज्यातील खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमध्ये कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी राज्य सरकारने सुधारित अनुकंपा नियुक्ती योजना लागू केली आहे. सेवेत असताना कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास किंवा कर्मचारी बेपत्ता होऊन सक्षम न्यायालयाने मृत घोषित केल्यास, कुटुंबातील पात्र सदस्याला नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

या योजनेनुसार अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती फक्त मंजूर व रिक्त गट-क आणि गट-ड पदांवरच दिली जाणार आहे. त्यामुळे नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्त राहील, असे सरकारने स्पष्ट केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत कुटुंबाला तातडीचा आधार मिळावा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

अनुकंपा नियुक्तीसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे तर कमाल ४५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. संबंधित पदासाठी आवश्यक शैक्षणिक, व्यावसायिक आणि तांत्रिक पात्रता असणे बंधनकारक राहील. गट-क पदांसाठी लागू असलेले सेवाप्रवेश नियम कायम राहणार आहेत. मात्र दिवंगत कर्मचाऱ्याचा पती किंवा पत्नी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण करू शकत नसल्यास, त्यांना गट-ड पदावर नियुक्ती देताना शैक्षणिक अर्हतेत सवलत देण्यात येणार आहे. ही सवलत केवळ पती किंवा पत्नीसाठीच लागू असेल.



या योजनेत प्राधान्यक्रमही ठरवण्यात आला आहे. प्रथम दिवंगत कर्मचाऱ्याच्या पती किंवा पत्नीला संधी दिली जाईल. त्यानंतर मुलगा किंवा मुलगी, विधवा किंवा परित्यक्ता मुलगी पात्र ठरेल. अविवाहित कर्मचाऱ्याच्या बाबतीत पूर्णतः अवलंबून असलेल्या भावाला किंवा बहिणीलाही संधी मिळू शकते; मात्र यासाठी कुटुंबातील इतर सदस्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल.

दिवंगत कर्मचाऱ्याचा पती किंवा पत्नी आधीच शासकीय अथवा निम शासकीय सेवेत कार्यरत असल्यास, त्या कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळणार नाही. तसेच ३१ डिसेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबालाही या योजनेतून वगळण्यात आले आहे.

अनुकंपा नियुक्ती हा कोणताही वारसा हक्क नसून, नियम, पात्रता आणि रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसारच नियुक्ती दिली जाईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. नियमबाह्य नियुक्त्या झाल्यास शाळा व्यवस्थापनावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# लोणी काळभोरच्या जनतेनी भाजपला पसंती दिल्याने विरोधकांच्या गोटात घबराट : योगेश काळभोर

**लोणी काळभोर, ता. ३१ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर परिसरात भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराने अक्षरशः वीज घेतली असून, जनतेचा उदंड व उत्स्फुर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे. विकास, पारदर्शकता आणि ठोस काम गिरीच्या जोरावर भाजपने मतदारांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले असून, खऱ्या अर्थाने गावाचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर भाजपलाच प्रचंड बहुमताने विजयी करा, असे स्पष्ट आवाहन लोणी काळभोरचे माजी सरपंच योगेश काळभोर यांनी केले आहे.

भाजपचे पुणे (उत्तर) जिल्हाध्यक्ष प्रदीपदादा कंद व दौंडचे कार्यसम्राट आमदार राहुल दादा कुल यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली लोणी काळभोरसह



संपूर्ण परिसरात विकासाची गती लक्षणीयरीत्या वाढली आहे. रस्ते, पाणीपुरवठा योजना, ड्रेनेज व्यवस्था, वाडी-वस्ती रस्ते, मूलभूत सुविधा यांसारखी अनेक कामे प्रत्यक्षात पूर्ण झाल्याने भाजपचा विकासाचा अजेंडा केवळ घोषणांपुरता न राहता जमिनीवर उतरलेला दिसत आहे. यामुळेच गावोगावी भाजपच्या कामाची चर्चा होत असून, जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत, त्यांचे हात अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराने भाजपला मतदान करावे, असे आवाहनही योगेश काळभोर यांनी केले. विकासाची गती कायम ठेवायची असेल, तर सत्ता पुन्हा भाजपच्याच हाती दिली पाहिजे, असे ते ठामपणे म्हणाले.

या निवडणुकीत भाजपकडून लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातून पूनम बाबुराव गायकवाड, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून श्वेता कमलेश काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून ज्ञानेश्वर नामुगाडे हे अधिकृत उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तिन्ही उमेदवारांचा प्रभावी जनसंपर्क, पारदर्शक कार्यपद्धती आणि विकासाचा स्पष्ट दृष्टिकोन मतदारांच्या मनाला भावत असून, भाजपचा विजय निश्चित अशी चर्चा गावागावात रंगू लागली आहे.

दरम्यान, लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील सिद्राम मळा परिसरात शनिवारी (ता. ३१) भाजपच्या वतीने जोरदार होम-टू-होम प्रचार करण्यात आला. या वेळी हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर, माजी सरपंच भरत काळभोर, माजी सरपंच माधुरी काळभोर, कदमवाकवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड, माजी उपसरपंच ज्योती अमित काळभोर, संगीता काळभोर, तानाजी काळभोर, कमलेश काळभोर यांच्यासह भाजपचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# अजितदादांच्या नावापुढे स्वर्गीय लिहिण्याचं धाडस माझ्यात नाही; रोहित पवारांची भावनिक साद

**बारामती, ता. ३१ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर अवघ्या ७२ तासांत राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेतृत्वाचा प्रश्न निकाली काढण्यात आला. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी विलक्षण वेगाने हालचाली करत सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड केली. सत्तेची व संघटनेची कोणतीही पोकळी निर्माण होऊ नये आणि नेतृत्व कुटुंबाबाहेर जाऊ नये, याची काळजी घेतल्याचे या घडामोडींमधून स्पष्टपणे दिसून आले.

मात्र मुंबईत राजकीय हालचाली वेगात सुरू असताना शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार आणि युगेंद्र पवार यांना या निर्णयप्रक्रियेपासून दूर ठेवण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली. स्वतः शरद पवार यांनीच आजच्या शपथविधीबाबत आपल्याला कोणतीही माहिती नसल्याचे जाहीरपणे सांगत या चर्चांना दुजोरा दिला. सुनेत्रा



पवार यांच्याशी कोणताही संवाद झालेला नसल्याचे सूचक वक्तव्य करत त्यांनी राष्ट्रवादीतील दोन प्रवाहांमधील दरी पुन्हा अधोरेखित केली. या घडामोडींचे तीव्र पडसाद अजित पवार यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या बारामतीत उमटत आहेत. अजित पवार यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी शहरभर मोठमोठे फ्लेक्स लावत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांच्या कार्यशैलीचा, निर्णयक्षमतेचा आणि करारी नेतृत्वाचा गौरव करणारे बॅनर सर्वत्र झळकत आहेत. मात्र या फ्लेक्सवर दिवंगत किंवा स्वर्गीय असे शब्द पाहून रोहित पवार भावनिक झाले.

सोशल मीडियावर पोस्ट करत रोहित पवार यांनी कळकळीची विनंती केली आहे. अजितदादांच्या नावापुढे स्वर्गीय लावण्याचं माझ्यात धाडस नाही. ते आजही आपल्यातच आहेत, त्यांच्या कामातून, विचारातून कायम जिवंत आहेत, असे म्हणत त्यांनी श्रद्धांजलीच्या बॅनरबाबत भावना व्यक्त केल्या. या पोस्टमधून बारामतीतील शोकाकुल, अस्वस्थ आणि भावनिक वातावरण प्रकर्षाने दिसून आले.

दरम्यान, पक्षातील नेते व पदाधिकाऱ्यांच्या आग्रहानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास होकार दिला आहे. आज सायंकाळी वाजता राजभवनात त्यांचा शपथविधी होणार आहे. त्याआधी विधान भवनात झालेल्या बैठकीत दिलीप वळसे पाटील यांनी गटनेतेपदाचा प्रस्ताव मांडला, तर छगन भुजबळ यांनी त्याला अनुमोदन दिले. या सर्व घडामोडींमधून राष्ट्रवादी काँग्रेसमधील सत्तासंघर्ष, कौटुंबिक राजकारण आणि भावनिक तणाव एकाच वेळी उफाळून आल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. अजित पवार यांच्या अनुपस्थितीत पक्षाची दिशा काय असेल आणि या निर्णयांचे राजकीय परिणाम काय होतील, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# खुर्ची माणसापेक्षा महत्त्वाची वाटतेय शपथविधीला घाई नको होती : संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर, ता. ३१ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांत नव्या उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी जाहीर होणे म्हणजे सध्याच्या राजकारणात माणसापेक्षा खुर्चीला अधिक महत्त्व दिले जात असल्याचे स्पष्ट चित्र आहे, अशी तीव्र टीका मंत्री व शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी केली आहे.

पत्रकारांशी बोलताना शिरसाट म्हणाले की, अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या शोकाकुल वातावरणात शपथविधी समारंभाला इतकी घाई करण्याची काहीच गरज नव्हती. हा शपथविधी काही दिवसांनी, अगदी आठवड्याभरानंतरही होऊ शकला असता. मात्र, घडत असलेल्या घडामोडींवरून सत्तेची घाई आणि अंतर्गत राजकारण अधिक ठळकपणे समोर येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली असून त्या सायंकाळी वाजता उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. बारामती येथे झालेल्या दुःखद विमान अपघातानंतर लगेचच या वेगवान राजकीय हालचाली घडल्या असून, याच पार्श्वभूमीवर शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली.

गेल्या दोन दिवसांत ज्या पद्धतीने घडामोडी घडत आहेत, त्यावरून खुर्ची माणसापेक्षा मोठी ठरत असल्याचे दिसते. सामान्य जनतेला हे चित्र निश्चितच आवडणारे नाही, असे शिरसाट म्हणाले. अजित पवार यांच्या निधनानंतर जे काही घडते आहे, ते कधीतरी होणारच होते, मात्र त्यासाठी इतकी घाई करण्याचे



कारण समजत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सुनेत्रा पवार यांनी इतक्या लवकर मुंबईकडे रवाना होणे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून येणारी विधाने ही मनाला न पटणारी असल्याचे शिरसाट यांनी नमूद केले. या घाईमुळे राजकीय संवेदनशीलतेचा अभाव दिसून येतो, असा टोला त्यांनी लगावला. पूर्वी अजित पवार यांच्या निर्णयाविरोधात कोणीही जाण्याची हिंमत करत नव्हते. मात्र आता ते हयात नसल्यामुळे भविष्यातील निर्णय सामूहिकरित्या घेतले जातील, असेही शिरसाट यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (शप) यांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू असल्याचे बोलले जात आहे. मात्र अजित पवार यांच्या निधनानंतर बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे हे विलीनीकरण तातडीने होण्याची शक्यता कमी असून, त्यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे शिरसाट यांनी सांगितले.

# गोविंदबागेत १७ जानेवारीला झालेली गुप्त बैठक

## शरद पवार, अजित पवारांसह प्रमुख नेते होते उपस्थित

**बारामती, ता. ३१ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात निधन झाले. अजितदादांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी महायुतीत उपमुख्यमंत्री होण्यास होकार दिला असून शनिवारी सायंकाळी ५ वाजता त्यांचा शपथविधी होणार आहे. दुसऱ्या बाजूला दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबाबत चर्चांना उधाण आले आहे. शरद पवार यांनीही बारामतीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत यावर भाष्य केले. अशातच १७ जानेवारी रोजी शरद पवार आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत दोन्ही पक्षाच्या प्रमुखनेत्यांचीगोविंदबागयेथेगुप्तबैठक पार पडल्याचे समोर आले आहे. याचा व्हिडीओ समाजमाध्यमावर व्हायरल झाला आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या



विलीनी करणाबाबत गेल्या चार महिन्यांपासून चर्चा सुरू आहे. मधल्या काळात महानगरपालिका निवडणूक होऊन गेली. त्यानंतर आता जिल्हा परिषद निवडणुका होणार असून यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार आहेत. ही निवडणूक आणि विलीनीकरणाबाबत बारामतीतील गोविंदबाग येथे दोन्ही राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली होती. १७ जानेवारी रोजी ही बैठक झाली होती. या बैठकीला शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, राजेश टोपे, हर्षवर्धन पाटील, रोहित पवार आणि अमोल कोल्हे उपस्थित होते. विशेष म्हणजे या व्हिडीओमध्ये सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ दिसत नाही. त्यामुळे तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकांत दुबार मतदानाला आळा; राज्य निवडणूक आयोगाची विशेष मोहीम

**पुणे, ता. ३१ :** मागील महानगरपालिका निवडणुकांच्या वेळी दुबार मतदानाचा मुद्दा चांगलाच ऐरणीवर आला होता. वारजे परिसरात शाई पुसून पुन्हा मतदान करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप झाल्यानंतर निवडणूक प्रक्रियेतील त्रुटींवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. या पार्श्वभूमीवर आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये दुबार मतदान रोखण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने कडक उपाययोजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद निवडणुकांसाठी एकूण २९ लाख ७६ हजार ४५४ मतदार नोंदणीकृत आहेत. प्राथमिक पडताळणीत यापैकी सुमारे ६७ हजार मतदारांची नावे दुबार असल्याचे आढळून आले आहे. अशा संभाव्य दुबार मतदारांच्या नावांसमोर दोन स्टारची खूण करून ही मतदार यादी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आली आहे.

तालुका पंचायत समिती स्तरावरील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना या मतदारांची सखोल तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात बीएलओ (बुथ लेव्हल ऑफिसर) यांच्या माध्यमातून मतदारांचे वय, पत्ता व ओळख यांची खातरजमा केली जाणार आहे. त्यानंतर संबंधित मतदारांशी थेट संपर्क साधून ते नेमके कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत, याबाबत



त्यांच्याकडून लेखी हमीपत्र घेण्यात येणार आहे. या हमीपत्राची स्वतंत्र नोंद ठेवली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

हमीपत्रानुसार मतदारांनी ठराविक ठिकाणीच मतदान करणे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे दुबार मतदानावर प्रभावी नियंत्रण मिळण्यास मदत होणार असून, ज्या ठिकाणी मतदार मतदान करणार नाहीत त्या ठिकाणच्या मतदार यादीतून त्यांचे नाव वगळण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकांचे कार्यक्षेत्र केवळ ग्रामीण भागातील ग्रामपंचायत क्षेत्रापुरते मर्यादित आहे. महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांचा यात समावेश नसल्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रातील दुबार मतदारांच्या नावांपुढे स्टारची नोंद करण्यात आलेली नाही. त्यामुळे सर्वच दुबार मतदारांवर पूर्ण नियंत्रण ठेवण्यात काही प्रमाणात मर्यादा येण्याची शक्यता आहे.

तरीही जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी आणि गैरप्रकार टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने उचललेली ही पावले महत्त्वाची मानली जात असून, त्याचा सकारात्मक परिणाम निवडणूक प्रक्रियेवर होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# पुण्यातील तरुणाची ६१ लाखांहून अधिक रकमेची सायबर फसवणूक

**पुणे, ता. ३१ :** सोशल मीडियावर झळकणाऱ्या आकर्षक गुंतवणूक जाहिराती नागरिकांसाठी किती घातक ठरू शकतात, याचे धक्कादायक उदाहरण वाघोली परिसरात समोर आले आहे. शेअर बाजारात कमी वेळात मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखवून सायबर भामट्यांनी एका तरुणाची तब्बल ६० लाख ९० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

वाघोलीतील बाएफ रस्ता परिसरात राहणाऱ्या या तरुणाला इन्स्टाग्रामवर शेअर मार्केट गुंतवणुकीशी संबंधित एक आकर्षक जाहिरात दिसली. या जाहिरातीत अल्पावधीत दुप्पट परतावा मिळेल, असे आश्वासन देण्यात आले होते. अधिक नफ्याच्या अपेक्षेने तरुणाने जाहिरातीवरील लिंकवर क्लिक




केले. त्यानंतर सायबर भामट्यांनी त्याला एका व्हॉट्सप ग्रुपमध्ये सामील करून घेतले.

या ग्रुपमध्ये बनावट स्क्रीनशॉट, नफा झाल्याचे दाखवणारे आकडे आणि खोट्या यशकथा शेअर करून तरुणाचा विश्वास संपादन करण्यात आला. सुरुवातीला अल्प रक्कम गुंतवण्यास सांगण्यात आले. काही दिवसांतच बनावट नफा दाखवून त्याच्यावर मोठी गुंतवणूक करण्याचा दबाव टाकण्यात आला. या आमिषाला बळी पडत तरुणाने स्वतःची बचत तसेच कर्ज काढून एकूण ६० लाख ९० हजार रुपये सायबर भामट्यांनी सांगितलेल्या विविध बँक खात्यांमध्ये जमा केले.

यानंतर नफा काढण्याचा प्रयत्न केला असता, वेगवेगळ्या कारणांचे दाखले देत पुन्हा पैशांची मागणी करण्यात आली. यावेळी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणाने वाघोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सायबर पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, सोशल मीडियावरील गुंतवणूक जाहिरातींवर विश्वास ठेवू नये, तसेच कोणतीही आर्थिक किंवा वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये, असे आवाहन पोलिसांकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

# यवत येथे श्री काळभैरवनाथ व महालक्ष्मी यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे साध्या स्वरूपात उत्सव

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ३१ : संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रसिद्ध असलेली यवत येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ आणि श्री महालक्ष्मी माता यांचा माघ पौर्णिमेनिमित्त होणारा वार्षिक यात्रा उत्सव यंदा रविवार (ता. ०१) आणि सोमवार (ता. ०२) फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे. यात्रेच्या तयारीला अंतिम स्वरूप आले असून गावात उत्साहाचे वातावरण आहे. मात्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकस्मित निधनामुळे यंदाची यात्रा साध्या पद्धतीने साजरी करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे.

दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या यात्रेत लोकनाट्य, कुस्त्यांचा आखाडा, ढोल-लेझीम स्पर्धा तसेच शोभेचा दारुगोळा असे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यंदाही सुरुवातीला अशा कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र २८ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे लोकनाट्य, कुस्ती आखाडा आणि दारुगोळ्याचे कार्यक्रम रद्द करण्यात आले असून यात्रा केवळ धार्मिक विधी आणि पारंपरिक कार्यक्रमांपुरती मर्यादित ठेवण्यात येणार आहे.

यात्रेच्या पहिल्या दिवशी रविवारी पहाटे महापूजा, देवांना पाणी घालणे व देवांचा



पोशाख होणार आहे. सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत दंडवत व नैवेद्याचा कार्यक्रम पार पडेल. सायंकाळी ६ ते ८ या काळात देवांच्या काठ्यांची मिरवणूक काढण्यात येणार असून, रात्री ९ ते १२ या वेळेत देवाच्या पालखीची मिरवणूक (छबीना) होणार आहे. दुसऱ्या दिवशी सोमवारी (ता. ०२) सकाळी श्री काळभैरवनाथ आणि श्री महालक्ष्मी मातेची केवळ महापूजा संपन्न होणार आहे.


गेल्या आठ दिवसांपासून आकाशी पाळणे, खेळणी विक्रेते तसेच विविध दुकानदार यवत परिसरात दाखल झाले असून मोक्याच्या ठिकाणी जागा मिळवण्यासाठी चुरस पाहायला मिळत आहे. सध्याच्या ग्रामीण राजकीय वातावरणामुळे यात्रेनिमित्त मोठी गर्दी होण्याची शक्यता असून जेवणावळींचेही आयोजन होणार असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, श्री काळभैरवनाथ व श्री महालक्ष्मी मंदिर आणि परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे व प्रकाशव्यवस्था बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# सरकारी जमिनीवरील घरांचा प्रश्न मार्गी; नव्या जीआरमुळे हजारो कुटुंबांना मालकी हक्काचा दिलासा

**पुणे, ता. ३१ :** ग्रामीण भागातील सरकारी जमिनीवरील जुन्या अतिक्रमणांचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. १ जानेवारी २०२१ पूर्वी झालेली अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वी घेतला असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडथळे येत होते. जमिनीचे अचूक मोजमाप, क्षेत्रफळाच्या मर्यादा आणि मोठ्या दंडरकमेच्या अटींमुळे ही प्रक्रिया कागदोपत्रीच अडकून पडली होती. परिणामी तहसील व जिल्हा स्तरावर हजारो प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित राहिले होते आणि ग्रामीण कुटुंबांवर बेदखलीची भीती कायम होती.

या पार्श्वभूमीवर १२ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आलेल्या नव्या सरकारी ठरावामुळे (जीआर) या प्रश्नावर तोडगा निघण्याची




शक्यता निर्माण झाली आहे. नव्या जीआरनुसार जमिनीच्या मोजणी प्रक्रियेत आवश्यक ती शिथिलता देण्यात आली असून दंड आकारणीचे निकषही अधिक सोपे आणि व्यवहार्य करण्यात आले आहेत. त्यामुळे केवळ तांत्रिक कारणांमुळे रखडलेली अतिक्रमण नियमितीकरणाची प्रकरणे आता मार्गी लागणार आहेत.

या निर्णयाचा सर्वाधिक फायदा सरकारी जमिनीवर वास्तव्यास असलेल्या ग्रामीण कुटुंबांना होणार आहे. अतिक्रमण नियमित झाल्यानंतर त्यांच्या घरांना कायदेशीर मान्यता मिळेल आणि बेदखलीची भीती कायमची दूर होणार आहे. अनेक कुटुंबे पिढ्यान्‌पिढ्या ज्या घरांत राहतात, त्या घरांना आता अधिकृत दर्जा मिळणार असल्याने सामाजिक आणि आर्थिक सुरक्षितता वाढण्यास मदत होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, नियमितीकरणानंतर संबंधित लाभार्थ्यांना मालकी हक्काचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. त्यामुळे गृहकर्ज घेण्याचा मार्ग खुला होणार असून प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना आणि शबरी घरकुल यांसारख्या विविध सरकारी योजनांचा लाभ घेता येणार आहे. आतापर्यंत केवळ कागदपत्रांच्या अभावामुळे या योजनांपासून वंचित राहिलेल्या गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हा निर्णय अत्यंत दिलासादायक आणि निर्णायक ठरणार आहे.

# अजित पवारांच्या जागी सुनेत्रा पवार; राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड

**मुंबई, ता. ३१ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्याच्या राजकारणात निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जलद हालचाली केल्या. पक्षातील आमदार, मंत्री आणि वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या सविस्तर चर्चा व सल्लामसलतीनंतर सुनेत्रा पवार यांच्या नावावर एकमत झाले असून, आज त्यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली.

विधान भवनात आज दुपारी पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव



मांडला, तर छगन भुजबळ यांनी त्यास अनुमोदन दिले. उपस्थित सर्व आमदारांनी कोणताही मतभेद न होता या प्रस्तावाला पाठिंबा दिला. या बैठकीला पक्षाचे राष्ट्रीय व राज्यस्तरीय नेते, मंत्री तसेच प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेतृत्वाबाबत पक्षात कोणताही वाद न होता निर्णय होणे, ही या बैठकीची विशेष बाब ठरली. सुनेत्रा पवार यांचा राजकारणाशी असलेला संबंध नवीन नाही. त्यांच्या माहेरच्या पाटील कुटुंबाला दीर्घ राजकीय परंपरा असून वडील बाजीराव पाटील हे त्यांच्या भागातील प्रभावी नेते होते. त्यामुळे प्रशासन, संघटन आणि सत्तेच्या कार्यपद्धतीची त्यांना चांगली जाण आहे. उपमुख्यमंत्री पद रिक्त राहणे सरकारसाठी अडचणीचे ठरू शकले असते. मात्र सुनेत्रा पवार यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेतृत्वाचा प्रश्न तातडीने निकाली निघाला असून सरकारलाही सातत्य राखता आले आहे. आता भावनिक पार्श्वभूमीसह राजकीयदृष्ट्याही मोठी आव्हाने त्यांच्या पुढे उभी असून, त्या ती कशा पद्धतीने हाताळतात याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## फळे आणि भाज्या दैनंदिन जीवनाचा एक भाग

**पुणे, ता. ३१ :** फळे आणि भाज्या आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहेत. आपल्या स्वयंपाकघरात विविध प्रकारच्या भाज्या आणि फळे ही कायम ठेवावीच लागतात. सर्व फळे आणि भाज्या वेगवेगळ्या प्रकारच्या पोषक तत्वांनी समृद्ध असतात. काही घरांमध्ये फळे आणि भाज्या दररोज किंवा आठवड्याभराच्या एकदा आणून ठेवल्या जातात. अशावेळी या भरपूर फळांची आणि भाज्यांची योग्य साठवणूक हा महत्त्वाचा भाग लक्षात घ्यायला हवा. खरंतर, काही फळे आणि भाज्या कधीही एकत्र ठेवू नयेत. असे केल्याने ते फळ किंवा भाजी खूप लवकर कुजण्यास आणि खराब होण्यास सुरुवात होते.

कोणती फळे आणि भाज्या एकत्र ठेवू नये : तुम्ही आणलेल्या भाज्या आणि फळांचे शेल्फ लाइफ वाढवायचे असेल, कोणती फळे आणि भाज्या एकत्र ठेवू नयेत हे जाणून घ्या.

काकडी आणि टोमॅटो : आपण अनेकदा फ्रीजमध्ये भाजीपाल्या सोबत काकडी आणि टोमॅटो एकत्र ठेवतो. काकडी आणि टोमॅटो एकत्र ठेवल्यास ते लवकर खराब होऊ लागतात. टोमॅटोमधून बाहेर पडणाऱ्या इथिलीन वायूमुळे काकडी लवकर कुजण्यास सुरुवात होते.

स्ट्रॉबेरी आणि ब्लूबेरी : उन्हाळ्यात येणारे स्ट्रॉबेरी आणि ब्लूबेरी एकत्र ठेवण्याची चूक करू नये. स्ट्रॉबेरीमधूनही इथिलीन वायू बाहेर पडतो. ज्यामुळे ब्लूबेरी लवकर कुजू शकतात. दुसरीकडे, ब्लूबेरी वजनाने थोडी जड असतात, त्यामुळे स्ट्रॉबेरी खराब होण्याचा धोका निर्माण होतो.

बटाटे आणि कांदे एकत्र ठेवू नका : बहुतेक घरांमध्ये बटाटे आणि कांदे एकत्र ठेवले जातात. परंतु बटाटे आणि कांदे कधीही एकत्र ठेवू नयेत. असे केल्याने बटाटे लवकर अंकुरतात. कांदे कुजायला लागल्यावर, कांद्यातून इथिलीन वायू बाहेर पडतो. त्यामुळे बटाटे खूप लवकर खराब होण्यास सुरुवात होते. कांदे बटाटे एकत्र ठेवल्यामुळे बटाट्यांमधून ओलावा बाहेर पडतो. त्यामुळे कांदा लवकर कुजण्यास सुरुवात होते. म्हणून या कांदे बटाटे कधीही एकत्र ठेवू नयेत.



## अक्षय गावडे यांचे निधन

थेऊर, ता. ३१ : येथील अक्षय विलास गावडे (वय -३३) यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, बहीण व आई वडील असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते विलास दामू गावडे व थेऊरच्या माजी ग्रामपंचायत सदस्या हेमलता विलास गावडे यांचे ते चिरंजीव होत.

# विरोधक भुईसपाट होणार, हा गड राष्ट्रवादी काँग्रेसचाच राहणार : सरपंच नागेश काळभोर

**लोणी काळभोर, ता. ३१ :** लोणी काळभोर हा राष्ट्रवादी काँग्रेसचा गड आहे, होता आणि कायम राहणार आहे. विरोधक कितीही कुटिल डावपेच आखोत, या निवडणुकीत त्यांचा पूर्णपणे पराभव होणार असून जनतेचा कौल पुन्हा एकदा राष्ट्रवादीच्याच बाजूने लागणार, असा ठाम, आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण निर्धार लोणी काळभोरचे सरपंच नागेश काळभोर यांनी व्यक्त केला.

राज्याचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री तसेच लोणी काळभोरच्या विकासाचे शिल्पकार कै. अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी विमान दुर्घटनेतील निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. अजितदादा हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर सर्वसामान्यांचे कामाचे दादा होते. राजकारण न करता लोकांच्या प्रश्नांना न्याय देणारा नेता म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती, असे सांगत नागेश काळभोर यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

लोणी काळभोरच्या सर्वांगीण विकासात अजितदादांचा सिंहाचा वाटा असून पाणीपुरवठा योजना, राम दरा पुलाचे काम, रस्ते, वीज, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधा त्यांच्या पाठपुराव्यामुळेच शक्य झाल्या, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांचेही या विकासात मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातून



राष्ट्रवादीकडून शीतल सुजित कांबळे, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून रेश्मा युवराज काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून अमोल टेकाळे हे अधिकृत उमेदवार रिंगणात आहेत. कै. अजितदादांनी आमच्यावर टाकलेला विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. हा विश्वास आम्ही प्रचंड मताधिक्याने विजय मिळवून सार्थ ठरवू, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. लोणी काळभोर जिल्हा परिषद गट, लोणी काळभोरवडकी आणि कदमवाकवस्ती पंचायत समिती गण हे राष्ट्रवादीचे पारंपरिक बालेकिल्ले मानले जातात. गेल्या अनेक वर्षांत येथे भरीव विकासकामे, लोकाभिमुख निर्णय आणि मजबूत संघटन उभे राहिले आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा विजय अटळ असून विरोधकांचे सर्व डावपेच निष्फळ ठरणार, असा ठाम विश्वास नागेश काळभोर यांनी व्यक्त केला. दरम्यान, ही निवडणूक केवळ राजकीय नाही, तर विकास विरुद्ध दिशाहीनता अशी लढाई आहे. विकासाला मतदान करणारी जनता पुन्हा एकदा राष्ट्रवादीला कौल देणार आहे. हा विजय म्हणजे कै. अजितदादा पवार यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे, असे ते म्हणाले.

शेवटी विरोधकांवर थेट प्रहार करताना नागेश काळभोर म्हणाले, कालपर्यंत राष्ट्रवादीत असलेले काही जुने नेते आज दुसऱ्यांच्या झेंड्याखाली उभे आहेत. त्यांनी ज्या योजना आणि विकासकामांचे श्रेय घेतले, ते सर्व अजितदादांच्या माध्यमातूनच झाले होते. हे सर्व जनतेला माहीत आहे. त्यामुळे या निवडणुकीत जनता त्यांना त्यांची योग्य जागा दाखवेल. विरोधक भुईसपाट होणार आणि हा गड राष्ट्रवादीचाच राहणार.

## रंगकाम करताना तोल जाऊन पडल्याने कामगाराचा मृत्यू

**पुणे, ता. ३१ :** रंगकाम करताना तोल जाऊन पडल्याने कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना तळजाई परिसरात घडली. दुर्घटनेस जबाबदार ठरल्या प्रकरणी ठेकेदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक दशरथ डेंगळे (वय ४९, रा. टिळेकनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) असे मृत्यूमुखी पडलेल्या कामगाराचे नाव आहे. याबाबत डेंगळे यांचा मुलगा अमर (वय २३) याने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, ठेकेदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक डेंगळे हे शुक्रवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास तळजाई परिसरातील गायत्री सोसायटीत रंगकाम करत होते. तेथे लाकडी पाळण्याचा वापर करुन ते इमारतीला रंग लावत होते. त्या वेळी अशोक यांचा तोल गेला. तोल जाऊन पडल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले.

# सुनेत्रा पवारांच्या शपथविधी आधी संजय राऊतांचा भाजपवर जोरदार हल्लाबोल

**मुंबई, ता. ३१ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेल्या शोकांतिकेचे वातावरण असतानाच, सत्ताकेंद्रात घडणाऱ्या वेगवान हालचालींमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्री पदावर त्यांची पत्नी सुनेत्रा पवार यांची नियुक्ती होणार असून, त्या आज शपथ घेणार आहेत. मात्र या निर्णयावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करत राजकीय वातावरण तापवले आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या दोन दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा बंगल्यावर भेट घेतली. या बैठकीत राष्ट्रवादीची खाती पक्षाकडेच राहावीत आणि सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात यावे, असा प्रस्ताव मांडण्यात आल्याची चर्चा आहे. या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना संजय राऊत यांनी भाजपवर निशाणा साधला. महाराष्ट्र अजूनही अजितदादांच्या दुःखातून सावरलेला नाही. अशा वेळी सत्तेचे डावपेच रचणे म्हणजे मढ्यावरच्या टाळूवरचे लोणी खाण्यासारखे आहे, असा बोचरा टोला त्यांनी लगावला.

या निर्णयामागे पडद्यामागील सूत्रधार कोण, असा सवाल उपस्थित करत राऊत यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नाव घेतले. हा निर्णय



राष्ट्रवादी काँग्रेसचा नसून दिल्लीतून लादलेला असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. पक्षात प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ यांसारखे अनुभवी आणि ज्येष्ठ नेते असतानाही घाईघाईने सुनेत्रा पवार यांचे नाव पुढे येणे, हे राजकीय गणिताचा भाग असल्याचा आरोप त्यांनी केला.

भाजपच्या पॅटर्नवर टीका करताना राऊत म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतरही भाजपने शिवसेना संपवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र तो प्रयत्न उद्धव ठाकरे यांनी हाणून पाडला. आता अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीतही असाच डाव खेळला जात असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, सुनेत्रा पवार यांचा शपथविधी केवळ रिक्त पद भरण्यापुरता मर्यादित नसून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आपले अस्तित्व टिकवण्यासाठी करत असलेली धडपड असल्याचेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. दुसरीकडे, शरद पवार यांनी या प्रक्रियेबाबत अनभिज्ञता व्यक्त केल्याने महायुतीतील अंतर्गत मतभेद आणि धुसफुस पुन्हा एकदा समोर आली असल्याचे संकेत मिळत आहेत.

## पती, मुलाला जिवे मारण्याची धमकी देऊन महिलेवर अत्याचार

**आंबेगाव, ता. ३१ :** पती, मुलीला जिवे मारण्याची धमकी देऊन महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी आंबेगाव पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत पीडित महिलेने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी गुरु दोडमणी (वय -२५), मयुर (वय २६), दीपक काटकर (वय २४, सर्व रा. लिपाणे वस्ती, सदगुरु हॉस्पिटल मागे, आंबेगाव खुर्द) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ वर्षीय पीडित महिला, तिचे पती, लहान मुलगी आंबेगाव परिसरात राहायला आहेत. आठ महिन्यांपूर्वी आरोपी दोडमणी महिलेचा पती घरात नसताना गेला. महिलेचा पती आणि मुलीला जिवे मारण्याची धमकी देऊन त्याने तिच्यावर बलात्कार केला. घाबरलेल्या महिलेने या घटनेची माहिती कोणाला दिली नाही. त्यानंतर आरोपी दोडमणीने महिलेला धमकावून तिच्यावर बलात्कार केला.

दोडमणीचे मित्र मयूर आणि दीपक यांनी महिलेच्या घरी गेले. तुझी बदनामी करेल, अशी धमकी आरोपींनी तिला दिली. महिलेच्या असहायतेचा फायदा घेऊन दोघांनी तिच्यावर बलात्कार केला. या घटनेमुळे घाबरलेल्या महिलेने अखेर आंबेगाव पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. गुन्हा दाखल झाल्यानंतर तिघे आरोपी पसार झाले आहेत. त्यांचा शोध घेण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक भोजलिंग दोडमिसे तपास करत आहेत.

# अजित पवार यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवडमध्ये अजित सृष्टी उभारा

## भाजप आमदार महेश लांडगेंच्या प्रशासनाला सूचना

**पिंपरी, ता. ३१ :** महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे लोकनेते, उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवड नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजपा नेते, आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांना सविस्तर निवेदन दिले आहे.

चिंचवड येथील डी-मार्टसमोरील ३३.८६ एकर जागेत उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय संकुलात सुमारे ८.६५ एकर क्षेत्रावर मुख्य इमारतीचे काम सुरू असून, भविष्यात महापालिकेचे संपूर्ण प्रशासकीय कामकाज याच ठिकाणाहून चालणार आहे. या पार्श्वभूमीवर, या इमारतीच्या आवारातच



दिवंगत अजितदादांचा पूर्णाकृती ब्राँझ पुतळा असलेले स्मारक उभारण्यात यावे.

आमदार लांडगे यांनी नमूद केले आहे की, दिवंगत अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती दिली. पायाभूत सुविधा, नागरी सेवा, प्रशासकीय निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख धोरणांमुळे राज्याला वेगळी ओळख मिळाली. असे नेतृत्व अकाली काळाच्या पडद्याआड जाणे ही महाराष्ट्राची मोठी हानी असून, त्यांच्या कार्याची जपणूक होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे नवनिर्वाचित नगरसेवकांच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत अजितदादांच्या स्मारकाचा प्रस्ताव मंजूर करून पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात यावी, यासाठी आम्ही आग्रही आहोत. तत्पूर्वी जुन्या महापालिका सभागृहात अजितदादांचे तैलचित्र तातडीने बसवण्यात यावे, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.

नवीन प्रशासकीय इमारतीतील सभागृहाला अजितदादा पवार सभागृह असे नाव देण्यात यावे आणि शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा विकास प्रवास, तसेच भविष्यातील नियोजन अधोरेखित करणारी पिंपरी-चिंचवड अजित सृष्टी उभारण्यात यावी, अशी संकल्पना आहे. शहराला विकासामध्ये एक नंबर बनवण्याचे स्वप्न अजितदादांनी पाहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. हे स्मारक भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देणारे ठरेल आणि हिच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा विश्वास आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

# अजितदादा मला माफ करा : महेश लांडगे

**पिंपरी, ता. ३१ :** उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्याचा हा दिवस जड अंतकरणाचा आहे. अजितदादा मला माफ करा, अशा शब्दांत भाजप आमदार महेश लांडगे यांनी माफी मागितली.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात मोठ्या प्रमाणात आरोप-प्रत्यारोप झाले होते. अजित पवार यांच्या निधनानंतर आमदार लांडगे यांनी त्यांची माफी मागितली आहे. चिंचवड येथे अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्व पक्षीय, सामाजिक संघटना, संस्था यांच्यावतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी लांडगे बोलत होते.

पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे म्हणाले, अजितदादांच्या अनेक आठवणी आहेत. कोणतेही काम असले तरी अजित पवार करायचे. नगरसेवक शेखर चिंचवडे म्हणाले, अजित पवार



यांनी मला एबी फॉर्म दिल्याने आज मी नगरसेवक आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्यासाठी वर्ष काम केलं. मात्र अजित पवारांना दिवस देखील देऊ शकलो नाही. कामातून त्यांच्यासोबत राहील. माजी महापौर संजोग वाघेरे म्हणाले, सुरुवातीपासून मला अजित पवार यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. वेगवेगळ्या पदावर काम करता आले. शहरातील मोठ मोठे उड्डाणपूल त्यांनी निर्माण केले. मागासवर्ग आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे म्हणाले, फुले शाहू आंबेडकर विचारांचा समक्ष साक्षीदार आम्ही गमावला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट म्हणाल्या, अजित पवारांच्या शोकसभेला सर्वांना बोलवावं अस वाटत नव्हते. सुनेत्रा पवार यांचा चेहरा पाहिल्यानंतर अनेक मन पिळवटून निघत आहे. त्यांच्या कुटुंबामागे उभे राहून खंबीर पाठिंबा देणे हीच आदरांजली आहे.

नगरसेवक संदीप वाघेरे म्हणाले, अजित पवार यांच्या शोकसभेला यावे लागेल असे वाटल नव्हते. मेट्रो आणि बस फ्री करावी हीच त्यांना आदरांजली. अजित पवारांचे स्मारक उभे करण्यात येईल. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे म्हणाले, कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना मला मोठे पद मिळाले.

शहरातील सगळ्या नेत्यांनी मुख्य पदापर्यंत पोहचायला एक एक पायरी करून दिली. अजित पवार यांनी पुरोगामी विचार जपला. शिवसेनेच्या नगरसेविका सुलभा उबाळे म्हणाल्या, अजित पवारांच्या विरोधात काम करताना राजकीय वाटचाल आमची सुरू झाली. प्रा. रामकृष्ण मोरे यांना विधानपरिषद निवडणुकीत मदत करा म्हणून फोन करणारे अजित पवार होते. विरोधकांना आर्थिक बजेट न दिल्याने दादाकडे तक्रार केली. त्यांनी मार्ग काढला. वैर जिवंतपणीच संपवायला हवे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूचा तपास सीआयडीकडे

## बारामती पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद

**पुणे, ता. ३१ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी बारामती परिसरात विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर आता या प्रकरणाची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीआयडी) करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे बुधवारी (ता. २८) मुंबईहून बारामतीकडे विमानातून निघाले होते. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी ते बारामतीत आले होते. एकाच दिवशी त्यांच्या बारामती परिसरात चार सभा होणार होत्या.

सकाळी आठच्या सुमारास मुंबईहून विमानाने उड्डाण केल्यानंतर बारामती विमानतळावर विमान उतरण्याच्या तयारीत असताना अपघात झाला. या अपघातात पवार यांच्यासह वैमानिक सुमीत कपुर,




सहवैमानिक शांभवी पाठक, अटेंडंट पिंकी माळी, पवारा यांचा अंगरक्षक विदीप जाधव यांचा मृत्यू झाला. पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी शोकाकूल वातावरणात बारामतीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, विमान अपघात प्रकरणाची नोंद बारामती पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बारामती पोलीस ठाण्यातील दाखल प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण शाखेकडून करण्यात येणार आहे, अशी माहिती सीआयडीचे अतिरिक्त पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी दिली. विमान अपघाताची चौकशी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाकडून सुरू करण्यात आली आहे.

# अजित पवार सत्तेमधून बाहेर पडणार होते?; शरद पवारांचा मोठा गौप्यस्फोट

**बारामती, ता. ३१ :** देशाचे माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत अनेक मोठे गौप्यस्फोट केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शरद पवारांनी पहिल्यांदाच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात भाष्य केले आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्या ही चर्चा चार महिने सुरू होती. याचं नेतृत्व अजित दादा आणि जयंत पाटील यांच्यावर होते. अपघात झाला आणि यात खंड पडला, असा मोठा गौप्यस्फोट शरद पवारांनी केला आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रीकरणाच्या तारीख देखील ठरली होती, असे देखील शरद पवार म्हणाले आहेत.



आमच्या पक्षात आणि त्यांच्या पक्षात एकत्र काम करण्याचं एकमत होतं. हा निर्णय १२ तारखेला जाहीर करायचा होता. ही तारीख अजितदादांनीच दिली होती. दोन्ही पक्षात सकारात्मक चर्चा होती पण अचानक ही घटना झाली. दोन्ही पक्ष एकत्र येण्यावरुन शरद पवारांना प्रश्न विचारताना भाजपासोबतच राहण्याचा विचार होता का अशी विचारणा करण्यात आली. त्यावर शरद पवारांनी, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या. पण भाजपासोबत नाही, असे वक्तव्य केले आहे. यानंतर आता अजित पवार हे दोन्ही राष्ट्रवादी विलीन झाल्यास सत्तेतून बाहेर पडणार होते असेच शरद पवारांनी त्यांच्या विधानातून सूचित केल्याची चर्चा रंगली आहे.

सध्या एक व्हिडीओ व्हायरल होत असून, या व्हिडीओत दोन्ही राष्ट्रवादीच्या नेत्यांची एकत्रीकरणासंदर्भात एक गुप्त बैठक पार पडली होती, असे सांगितले जात आहे. या बैठकीला दोन्ही बाजूंचे महत्वाचे नेते उपस्थित होते. शरद पवार आणि अजित पवार देखील होते. दुसरीकडे सुनेत्रा पवार मुंबईत दाखल झाल्यानंतर बारामती मोठ्या हालचाली होत असून, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या महत्वाच्या नेत्यांची बैठक पार पडल्याची माहिती समजते. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर कोणत्या राजकीय घडामोडी घडणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

अजित पवार हे कर्तृत्ववान नेते होते. संघटनेत काम करताना त्यांनी नेहमीच सामान्य जनतेशी थेट संवाद साधला. लोकांचे प्रश्न समजून घेणे, त्यावर माहिती घेणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, हेच अजित पवारांचे वैशिष्ट्य होते. अशा शब्दांत शरद पवार यांनी अजित पवार यांच्या विषयी भावना व्यक्त केल्या. प्रत्येक व्यक्तीचे समाजासाठी काही ना काही योगदान असते. अजित अनेक वर्षे संघटनेत सक्रिय राहून लोकांच्या प्रश्नांसाठी झटत राहिले. त्यांची कामाची सुरुवात पहाटेच होत असे. कामात कधीही त्यांनी कमतरता दाखवली नाही, असे देखील शरद पवार म्हणाले.